महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

ठाणे ते बोरिवली जलद मार्ग व मेट्रो कारशेडच्या बांधकामास होत असलेला विलंब

(१) ४२८८० (१९-०५-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रिय पर्यावरण मंत्रालय आणि राष्ट्रीय हरित लवादाच्या दोन वेगवेगळ्या आदेशामुळे प्रस्तावित ठाणे ते बोरिवली असा जलद मार्ग तसेच मेट्रो ३ प्रकल्पाकरिता आरे कॉलनीत कारशेड बांधणे या दोन महत्वांकाक्षी प्रकल्पांना विलंब होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन काय कार्यवाही करणार वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (२१-०९-२०१९) : (१) नाही.

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉ.लि. यांच्याकडील प्राप्त माहितीनुसार केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाच्या दि.०५.१२.२०१६ च्या अधिसूचनेनुसार आरे कॉलनी येथील मेट्रो प्रकल्प-३ च्या कार आगाराचे क्षेत्र बाधित होत नसून त्यामुळे विलंब होणार नाही. तसेच, राष्ट्रीय हरित लवादासमोर दि.२०.०९.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीत मूळ अर्जदाराने त्यांचा अर्ज मागे घेतल्यामुळे सदर प्रकरण निकाली निघाले आहे. तसेच, राष्ट्रीय हरीत लवादाने सदर प्रकरणात कोणत्याही प्रकाराचे प्रतिबंधनात्मक आदेश दिलेले नसल्याने यापुढे कामात विलंब होण्याची शक्यता नसल्याचे कळविले आहे.

तसेच, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कळविल्यानुसार टिकूजीनीवाडी ठाणे ते बोरीवली दरम्यान ३ लेनचे दोन बोगदे बांधणे या प्रकल्पासाठी पर्यावरण नाहरकत दाखल्याची आवश्यकता नाही. तसेच, सर्वेक्षणाची परवानगी दि.१४.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे.

(२) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यावर व प्रकल्पासाठी आवश्यक निधी प्राप्त झाल्यावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाडकडून प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राजापूर (ता.जि.रत्नागिरी) येथे शासकीय जागेवर राहत असलेल्या कुटुंबाना जमिनीचे कायमस्वरुपी मालकी हक्क देण्याबाबत

(२) ४६३१९ (०१-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (ता.जि.रत्नागिरी) येथे मागील शंभर वर्षापासून सरकारी गावठाण जागेवर पक्की घरे बांधून राहत असलेल्या रहिवाशांना या जागेचा कायमस्वरुपी मालकी हक्क नसल्याने शासनाच्या सुविधांचा लाभ, बँक कर्ज मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात रेकॉर्ड ऑफराईट लागू होण्याअगोदरपासून ब्रिटीश राजवटीत नोंद खत अस्तित्वात आले तेव्हापासून अस्तित्वात असलेल्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावरील देवस्थान इनाम, देवरहाटी, देवराई, गोठण, पाणंद, गावठण, गुरचरण, मसणवटा, कब्रस्थान वगैरे नोंदी सध्याच्या परिस्थिती त्रासदायक होऊ लागल्या असल्याने त्या रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-०९-२०१९) : (१) राजापूर नगरपरिषद हद्दीत राजापूर, धोपेश्वर, कोडेतड या गावाचे नगर भूमापन मोजणीचे काम पूर्ण झाले असून मिळकतीच्या चौकशीचे काम सुरु आहे. नगर भूमापन अभिलेख तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तेथील रहिवाश्यांना अधिकार अभिलेख अभावी प्रश्नात नमूद समस्यांना तोंड द्यावा लागणार नाही.
(२) अधिकार अभिलेखातील देवस्थान इनाम, देवरहाटी, देवराई, गोठण, पाणंद, गावठाण, गुरचरण, मसणवटा, कब्रस्थान इ. स्वरुपाच्या नोंदी ह्या जमिनीच्या पारंपारिक वापराच्या अनुषंगाने घेतलेल्या नोंदी आहेत. अशा नोंदीबदल आक्षेप असल्यास त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करणे आवश्यक आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

मौजा लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील गट नं ३९४ मधील ग्रामपंचायतीची जागा अतिक्रमणधारकांना नियमित करणेबाबत

(३) ८६५७६ (१२-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील गट नं. ३९४ मधील ग्रामपंचायतीची जागा अतिक्रमणधारकांना नियमित करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिनांक २५ आक्टोबर, २००४ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ येथील पीआयएल नं. ३९/२०१४ च्या न्याय निवाड्यामध्ये राज्य शासनाचा निर्णय दिनांक ४ एप्रिल, २००२ व दिनांक १२ जुलै, २०११ तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २८ जानेवारी, २०११ च्या आदेशाचे पालन करुन शासकीय जागेवर राहत असलेल्या झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे उतारे देणेकरीता कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा प्रशासनास आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लासलगाव येथील उक्त जागेवरील अतिक्रमण कायम करुन रहिवाशांना मालकी हक्काचे उतारे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१९) : (१) होय.

(२) अध्यक्ष, श्रावणबाळ मातापिता सेवा संघ यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.३९/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.२३ जून, २०१५ रोजी आदेश पारीत करून शासन निर्णय दि.१२ जुलै, २०११ व सिव्हील अपील क्र.११३२/२०११ (जगपालसिंग व इतर विरूद्ध पंजाब सरकार) या दाव्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८.०१.२०११ रोजी दिलेल्या निकालाचे पालन करून सत्वर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत व सदर याचिका निकाली ठेवली आहे.

(३) विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या पत्रान्वये अधिनस्त जिल्हाधिकारी तसेच महानगर पालिका आयुक्त यांना मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(४) शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत शासन निर्णय दिनांक ४.०४.२००२ मधील तरतूदीनुसार तहसिलदार, निफाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच, ग्रामविकास विभाग, शासन निर्णयक्र.प्रआयो-२०१७/ प्र.क्र.३४८/ योजना-१०, दि.१६.०२.२०१८ अन्वये सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबतचे धोरण विहीत करण्यात आले असून त्यानुसार सदरची अतिक्रमणे नियमित करता येतील किंवा कसे याची पडताळणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

इंदापूर (जि.पुणे) तालुक्यातील उपअधीक्षक, भूमीअभिलेख यांनी लाच घेतल्याबाबत

(४) १०२२७३ (२१-१२-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळेगाव (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील गट क्र.सहा मधील जमिनीची मोजणी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे करण्यासाठी उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांनी ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून पंचवीस हजार रुपये लाच घेतल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पैसे दिल्याशिवाय जमिनीची मोजणी करण्यात येणार नाही तसेच मोजणीचा अहवाल न्यायालयात सादर केला जाणार नाही असेही उपअधीक्षकाकडून तक्रारदाराला सांगण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त तालुक्यातील उपअधीक्षक, भूमिअभिलेख यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१९) : (१) तक्रारदार श्री.सुखदेव रघुनाथ गुळूमकर, रा.पणदारे (पवईमाळ), ता.बारामती, जि.पुणे यांच्या मौजे पिंपळे,तालुका इंदापूर,जिल्हा पुणे येथील गट नं. ६ ची मोजणी करून नकाशा तयार करून अहवाल न्यायालयात पाठविण्याच्या प्रकरणात, श्री.सतीश सोपान काटे, निमतानदार क्र.१, उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, इंदापूर, जि.पुणे यांनी तक्रारदाराकडे रु. ५०,०००/- इतक्या रकमेची मागणी करुन त्यापैकी रु. २५,०००/- इतक्या रकमेची लाच दिनांक ०३.११.२०१७ रोजी स्वीकारल्याच्या आरोपावरुन त्यांना अटक करण्यात आले होते.

(२) तथापि, दिवाणी न्यायालय, बारामती यांच्याकडील दिनांक रे.मु.नं. ८०/२०१० मधील दिनांक २२.०३.२०१७ च्या आदेशानुसार संबंधित कर्मचारी श्री. काटे, निमतानदार क्र.१ यांनी दिनांक २४.०७.२०१७ रोजी मोजणी करुन, कोर्ट कमिशन मोजणीचा नकाशा उपअधीक्षक, भूमि अभिलेख, इंदापूर यांनी दिनांक ३१.१०.२०१७ च्या पत्रान्वये दिनांक ०४.११.२०१७ रोजी मा.दिवाणी न्यायालयात सादर केलेला आहे.

(३) व (४) त्यामुळे श्री. सतीश सोपान काटे, निमतानदार क्र.१ यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७, १३(१)(ड)सह १३(२) प्रमाणे इंदापूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण येथे गु.र.नं. ७८८/२०१७ अन्वये दिनांक ०४.११.२०१७ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यास्तव, उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांच्या दिनांक १३.११.२०१७ च्या आदेशान्वये आ.लो.से. सतीश सोपान काटे, निमतानदार क्र. १ यांना शासन सेवेतून दिनांक ०४.११.२०१७ पासून निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा (जि.सोलापूर) तहसील कार्यालयातील तहसिलदार पद भरण्याबाबत

(५) ११०९३३ (२७-०३-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तहसील कार्यालयातील तहसिलदार पद रिक्त असल्यामुळे सामान्य जनतेची अनेक कामे प्रलंबित राहत असल्याने लोकप्रतिनिधी, पंढरपूर-मंगळवेढा यांनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे उक्त पदी तातडीने तहसीलदारांची नियुक्ती करणेबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने अद्यापही तहसिलदारांची नियुक्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार मंगळवेढा तहसिल कार्यालयातील रिक्त असलेले तहसिलदार पद तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१९) : (१), (२) व (३) तहसीलदार, मंगळवेढा हे रिक्त पद भरण्याबाबत मागणी प्राप्त झाली होती.

सदर पद शासन आदेश दि.१५/२/२०१८ अन्वये भरण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

पाटण (जि.सातारा) तालुक्यातील नद्यांवर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधण्याबाबत

(६) ११९८६३ (२३-०७-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील मोरणा, उत्तरमांड. तारळी व वांग खोऱ्यामध्ये मध्यम स्वरूपाच्या नद्या असून पावसाळ्यात या नद्यांना येणारे पाणी अडविण्याकरीता कोणतेही साधन नसल्याने नद्यांचे पावसाळ्यातील पाणी वाहून जाते व पुढील आठ महिने या गावातील लोकांना शेतीच्या पाण्यासाठी विहिरींच्या पाण्याचा वापर करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोरणा, उत्तरमांड. तारळी व वांग खोऱ्यामध्ये माध्यम स्वरूपाच्या नद्यांवर शासनाच्या खर्चाने कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बंधाणेस सन २०१७-१८ च्या शासनाच्या अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध करून देणेबाबत राज्याचे जलसंपदा राज्यमंत्री यांचेकडे दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नद्यांवर कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे बांधणेस निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात यत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) : (१) नाही. मोरणा, उत्तरमांड, तारळी व वांग खोऱ्यामधील नद्यांवर तारळी हे मोठे धरण तसेच मोरणा व उत्तरमांड ही मध्यम धरणाची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. या धरणामध्ये पाणीसाठा होत आहे. वांग मध्यम प्रकल्पाच्या धरणाचे काम प्रगतीपथावर आहे

(२) होय.

(३) तारळी, वांग व मोरणा गुरेघर या प्रकल्पांसाठी शासनाने खालीलप्रमाणे निधी उपलब्ध केला आहे.

(रु.कोटीत)

प्रकल्प	सन २०१७-१८	सन २०१८-१९	सन २०१९-२०
तारळी	६१.९०	११४.८०	९५.००
वांग	५४.४२	८५.३६	२०.००
मोरणा	२९.६६	३०.००	२५.००

दिनांक २४.१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेल्या नवीन कोल्हापूर पध्दतीचे बंधा-यापैकी अ.क्र.१ खळे येथे वांग नदीवर वांग मध्यम प्रकल्पांतर्गत कोल्हापूर पध्दतीचे बंधारेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच अ.क्र. ५ -काळगांव , ता. पाटण येथील साखरी नाल्यावर १ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा पुर्ण व १ को.प. बंधारा प्रगतीत व इतर २ प्रस्तावित आहेत. अ.क्र. ७-माजगाव ता.पाटण येथे उत्तरमांड नदीवर उत्तरमांड प्रकल्पांतर्गत माजगाव-१, माजगाव-२ व माजगाव-३ हे कोल्हापूर बंधारे पुर्ण करण्यात आलेले आहे. कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार कृष्णा खो-यातील पाणी वापराचा बृहत आराखडा महाराष्ट्र शासनाने दि.२०.१०.२००१ च्या पत्रान्वये केंद्रीय जल आयोगास सादर केलेला असून त्यामधील तरतुदीनुसार ५९९ टिएमसी पाणी वापराचे नियोजन पुर्ण झालेले आहे. उर्वरित मागणी केलेले बंधारे महाराष्ट्र कृष्णा खारे विकास महामंडळ, पुणे यांच्या प्रकल्पामध्ये समाविष्ठ नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील महसूल विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(७) १२९०१५ (३०-११-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात महसूल विभागातील तलाठी आणि लिपिकांची ११२ पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) मंडळातील १४ पैकी ३ गावातच तलाठी कार्यरत असल्याने अनेक तलाठ्यांवर अतिरिक्त पदभार सोपवला असून त्यमुळे नागरिकांची कामे प्रलंबित राहून त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय तसेच कोल्हापूर जिल्हयातील महसूल विभागातील पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-१०-२०१९) : (१) माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये कोल्हापूर जिल्हयात तलाठी संवर्गाची-५६ व लिपीक-टंकलेखक संवर्गाची ४३ अशी एकूण ९९ पदे रिक्त होती.
(२) माहे सप्टेंबर २०१८ मध्ये कोडोली ता. पन्हाळा या मंडळामध्ये एकूण १४ गावांकरीता ८ तलाठी सजापैकी ७ सजामध्ये तलाठी कार्यरत होते. सद्यस्थितीत कोडोली मंडळामध्ये प्रत्येक सजास एक प्रमाणे एकूण ८ तलाठी कार्यरत आहेत.
(३), (४) व (५) सन २०१९ च्या महापदभरतीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हयातील तलाठी संवर्गाच्या एकूण- ६७ पदांची भरती प्रक्रियेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

तथापि, वित्त विभागाच्या दि.२५.०५.२०१७ व दि.२९.०६.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार महसूल विभागाचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही चालु आहे. सुधारित आकृतीबंध निश्चितीनंतर लिपिकांच्या पदभरती बाबत कार्यवाही करण्यात येईल.

मुंबईत दुसरा समुद्रपूल (सी लिंक) बांधण्याबाबत

(८) १३०५१७ (३०-११-२०१८). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत दुसरा समुद्रपूल (सी लिंक) बांधण्याबाबत दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ रोजी शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पूल कोणत्या ठिकाणादरम्यान बांधण्यात येणार आहे व या पूलाच्या बांधकामास किती खर्च अपेक्षित तसेच पुलाचे बांधकाम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१३-०९-२०१९) : (१) होय, तथापि सदर समुद्रपूल बांधण्याचा निर्णय दि.०३.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.
(२) सदर पुल बांद्रा ते वर्सोवा या दरम्यान बांधण्यात येणार आहे, व या पूलाच्या बांधकामास अंदाजित रु.११३३२.८२ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच, सदर पुलाचे बांधकाम प्रत्यक्षात सुरु झाल्यापासून ५ वर्षे इतक्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महिला केंद्री धोरणाचे वेगळे अंदाजपत्रक बनविण्याबाबत

(९) १३३८२६ (०५-१२-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिक आणि प्रशासकीय धोरणांमधील समानतेचा दृष्टीकोन वाढविण्यासाठी राज्य शासनाने महिला कल्याणकारी अर्थसंकल्पातंर्गत अर्थसंकल्पीय तरतूद केली असतानाही गेल्या चार वर्षांत महिला केंद्री धोरणाचे वेगळे अंदाजपत्रक तयार केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंदाजपत्रकामध्ये शासनाच्या विविध योजना व त्यासाठी करण्यात आलेली निधीची तरतूद, स्त्रीयांच्या सद्यस्थितीनुसार योजना तयार करण्याची निकड अशा विविध बाबींचा अंतर्भाव अपेक्षित असतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू महिला केंद्री धोरणाचे वेगळे अंदाजपत्रक बनविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०१९) : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात लिंग आधारित विवरणपत्र प्रसिध्द करण्यात येणार आहे. यामध्ये महिलांच्या योजनांसाठी केलेली तरतूद व प्रत्यक्ष खर्च याचा अंतर्भाव असणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयात खारेपाटण (ता.कणकवली) हा नविन तालुका निर्माण करण्याबाबत

(१०) १३४८३० (०४-०६-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील खारेपाटण (ता.कणकवली) तालुका कृती समितीने नवीन ६० महसुली गावांचा खारेपाटण तालुका निर्माण करण्याबाबत मागणी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.महसूल राज्यमंत्री व अप्पर मुख्य सचिव यांच्याकडे माहे जानेवारी, २०१९ मध्ये परिपूर्ण प्रस्ताव देऊन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने अप्पर मुख्य सचिव, महसूल यांनी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांना सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच त्याबाबतची सध्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१९-०९-२०१९) : (१) अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) व (३) तालुका निर्मितीचे निकष ठरविण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. सदर अहवालाची तपासणी करुन तालुका निर्मितीबाबत निकष निश्चित करण्याकामी धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तालुका निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुसळेपाडा नळ पाणी पुरवठा योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

(११) १३५०९५ (११-०७-२०१९). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धामणी ग्रुप ग्रामपंचायती अंतर्गत येणा-या मुसळेपाड्याच्या पाणीपुरवठा योजनेचे काम प्रशासन आणि ठेकेदारांच्या हलगर्जीपणामुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदिवासी वस्तीत सन २००६ मध्ये १६ लाख रुपये मंजूर करून पाणी पुरवठा योजना मंजूर केली असून या पाड्यात पाईप लाईन व टाकीचे काम अपूर्ण असल्याने येथील जनतेचा पाण्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आदिवासी पाड्यातील जनतेच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सन २००६ पासून काम पूर्ण न करणाऱ्या शासकीय अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१६-०९-२०१९) : (१) (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मुसळेपाडा नळ पाणी पुरवठा योजनेतील उंच साठवण टाकीचे काम वगळता उर्वरीत सर्व उपांगांची कामे पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तथापि, भुजल पातळी खालावून उद्भव कोरडा झालेला असल्याने एप्रिल, २०१९ पासून पाणी पुरवठा बंद आहे. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा हलगर्जीपणा व योजनेतील उंच साठवण टाकीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या जागेचा वाद निर्माण झाला असल्यामुळे साठवण टाकीचे कंटेनरचे काम प्रलंबित आहे. तथापि, सदर पाईप लाईनचे काम पूर्ण करुन दोन वर्षापूर्वीच आदिवासी वस्तीत बायपासद्वारे पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

या आदिवासी पाड्यात पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी पुरेशा प्रमाणात विद्युत दाब मिळत नसल्यामुळे पाणी पुरवठा वारंवार खंडीत होत असे. त्यावर पर्यायी व्यवस्था म्हणून सौरपंप बसविण्यात आला असून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला होता. परंतु सद्य:स्थितीत भूजल पातळी खाली गेल्यामुळे व उद्भव कमी होत असल्यामुळे माहे एप्रिल, २०१९ पासून सदर योजना बंद आहे. टंचाई कालावधीत टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

गोंदिया जिल्हयातील मनरेगा मजुरांना कामे मिळण्याबाबत

(१२) १३५४७३ (११-०७-२०१९). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात २२ ग्रामपंचायती अंतर्गत मनरेगाची १०६ कामे सुरु असतांना फक्त ४८३ मनरेगा मजुरांना कामे दिल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिल्हयात लाखो मनरेगा मजुर असल्याने मनरेगा यंत्रणा त्या प्रमाणात कामे काढत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. जयदत्त क्षीरसागर (२४-०९-२०१९) : (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

गोंदिया जिल्हयात २२ ग्रामपंचायतीमध्ये दि.२/०४/२०१९ रोजी १०६ (वृक्षलागवड व आवास योजना) कामे सुरु होते व ४८३ मजूर कामावर होते. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील हजेरीपत्रक एमआयएस ऑनलाईन करण्याची कार्यवाही पूर्ण करुन त्यानंतर दि.३/०४/२०१९ पासून मजूरांचे मागणीनुसार हजेरीपत्रक निर्गमित केल्यानंतर २६५ ग्रामपंचायतीमध्ये ८२५ कामावर २१,२४२ मजूर कामावर होते. सद्यस्थितीत माहे जून, २०१९ पर्यंत ४८,६६४ मजूरांना कामे पुरविण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्याबाबत

(१३) १३५८४९ (०१-०७-२०१९). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला),

श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष पद गत ४ वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ही पदे रिक्त असल्यामुळे मच्छीमारांच्या कल्याणाच्या व रोजगाराच्या योजना बंद पडल्यामुळे महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची त्वरीत नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. महादेव जानकर (१८-०९-२०१९) : (१) होय, हे खरे आहे. महामंडळाच्या संचालक मंडळावरील अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार मा.मंत्री (पदुम) यांच्याकडे आहे व उपाध्यक्ष हे पद रिक्त आहे.

(२) सदर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(३) महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या मच्छिमारांच्या विविध योजना सुरु आहेत. महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपळगांव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) येथे कायमस्वरुपी तलाठी नियुक्त करण्याबाबत

(१४) १३६१४३ (०१-०७-२०१९). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगांव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) येथे गत २ वर्षांपासून कायमस्वरुपी तलाठ्याची नेमणूक न केल्यामुळे नागरीकांची अनेक कामे ठप्प झाली असून शेतकऱ्यांना ७/१२ उताऱ्यांसह इतर उतरे मिळणे अडचणीचे झाल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पिंपळगाव बसवंत येथे कायमस्वरुपी तलाठी नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०१-१०-२०१९) : (१) पिंपळगाव बसवंत, ता.निफाड, जि.नाशिक येथील तलाठी पद रिक्त होते. सबब, नागरीकांची गैरसोय होऊ नये यास्तव या सजेचा अतिरिक्त कार्यभार अन्य तलाठी यांना सोपविण्यात आला होता.

(२), (३) व (४) उपविभागीय अधिकारी, निफाड उपविभाग, निफाड यांच्या दि.०६.०२.२०१९ च्या आदेशान्वये पिंपळगाव बसवंत, ता.निफाड, जि.नाशिक येथे नियमित तलाठी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

ठाणे आणि मुलुंड दरम्यान असलेल्या टोल नाक्यांवरुन ठाणे येथील नागरीकांच्या वाहनांना टोलमुक्ती मिळण्याबाबत

(१५) १३६२१३ (०५-०७-२०१९). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि मुलुंड दरम्यान असलेल्या टोल नाक्यांवरुन ठाणे येथील नागरीकांच्या वाहनांना टोलमुक्ती मिळावी यासाठी नागरीकांनी दिनांक ०३ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास तसेच वारंवार टोलनाक्यावर आंदोलन करुन मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१३-०९-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

टोल संघर्ष समिती, ठाणे यांनी दि.०५.०२.२०१९ रोजी लाक्षणिक उपोषण करणार असल्याचे मे. एम.ई.पी. कंपनीस कळविले होते व त्याची प्रत मा.मंत्री, (सार्वजानिक बांधकाम, सार्वजनिक उपक्रम वगळून) व मा.मंत्री, (सार्वजानिक बांधकाम, सार्वजानिक उपक्रम) यांना देण्यात आली आहे.

(२) थोडक्यात स्वरुप खालीलप्रमाणे

ठाणे येथील नागरिकांना दैनंदिन व्यापार, शैक्षणिक व इतर कामांसाठी मुलुंड व ऐरोली परिसरात रोज जा ये करावे लागते व या ठिकाणी पथकर नाक्यांवर टोल भरण्यासाठी रांग लागते. त्यामुळे, ठाणे परिसरातील वाहनांना टोल भरण्यापासून मुक्तता मिळावी.

(३) नियमात तरतूद नसल्याने ठाणे येथील वाहनधारकांना पथकरातून सूट देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे, सिंहगड रोड, खानापूर, डोणजे, खडकवासला भागातील तलाठी कार्यालयात हजर नसल्याबाबत

(१६) १३६४८३ (०५-०७-२०१९). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सिंहगड रोड, खानापूर, डोणजे, खडकवासला भागातील तलाठी कार्यालयात तलाठी यांच्यासह अधिकारी-कर्मचारी एक महिन्यापासून उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना जमिनीचे उतारे, उत्पन्नाचे दाखले इत्यादी कागदपत्रे विहित वेळेत मिळत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी सरपंच, लोकप्रतिनिधी यांनी तक्रारी केल्या असुन स्थानिक वृत्तपत्रातही सदर बातमी छापून आली असताना विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कुठलीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन दोषी असणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२४-०९-२०१९) : (१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

लोकसभा-२०१९ च्या सार्वत्रिक निवडणूकीचे कामकाजासाठी सर्व कामगार तलाठी व मंडळ अधिकारी यांची नियुक्ती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, खडकवासला यांचे कार्यालयात करण्यात आली होती. तथापि, आठवड्यातील दोन दिवस (सोमवार व गुरुवार) तलाठी त्यांचे कार्यालयात कार्यरत होते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाच्या 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यातील शेततळ्यांची कामे पूर्ण करणेबाबत

(१७) १३६५०० (११-०७-२०१९). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतक-यांना सिंचनाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने 'मागेल त्याला शेततळे' ही योजना सुरु केली असून राज्य शासनाकडून कृषी विभागाला उद्दिष्ट देण्यात आले असतांनाही परभणी जिल्ह्यात शेततळ्यांचे कामे संथ गतीने सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना त्यांचे प्रस्ताव मंजूर करुन शेततळे खोदण्यासाठी वारंवार कृषी विभागाकडे जावे लागत आहे तसेच शेततळ्यासाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदानही अत्यल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कृषी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह 'मागेल त्याला शेततळे' या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयदत्त क्षीरसागर (२७-०९-२०१९) : (१) हे खरे नाही, शेतक-यांच्या मागणीनुसार शेततळ्याची कामे घेण्यात येतात. परभणी जिल्ह्यात मागेल त्याला शेततळे योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या ३००० शेततळ्यांच्या लक्षांकापैकी ३०६४ शेततळी पूर्ण झाली असून १६ शेततळयांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२), (३), (४) हे खरे नाही. "मागेल त्याला शेततळे" ही योजना अनुदान तत्वावर आधारीत असून या योजनेअंतर्गत विविध आकारमानानुसार रु.५०,०००/- इतक्या कमाल मर्यादेत अनुदान देय आहे.

लातूर जिल्ह्यात रोहयोच्या कामांची संख्या वाढविण्याबाबत

(१८) १३६५७३ (११-०७-२०१९). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यात मार्च, २०१९ अखेरीस महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची कामे बंद झाल्याने मजूर बेरोजगार झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,जिल्ह्यातील फक्त ६०० मजुरांच्या हाताला काम असून ६ हजार मजूर कामाविना आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रोहयोअंतर्गत कामांची संख्या वाढावी व मजूरांना काम मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयदत्त क्षीरसागर (२७-०९-२०१९) : (१), (२) व (३) नाही, हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यात साप्ताहिक अहवालानुसार मार्च, २०१९ अखेर ९६ कामावर ८५० एवढी मजूर उपस्थिती होती. तसेच, माहे एप्रिल, २०१९ च्या दरम्यान ४६३६ मजूरांनी काम मागणी केली असता, त्यांना काम उपलब्ध करुन देण्यात आलेली असून १०८६ कामे सुरु होती. काम उपलब्ध करुन दिल्यामुळे मजूर बेरोजगार झालेले नाहीत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गम मजूरांची संख्या वाढविण्यासाठी जिल्हास्तरावर सर्व यंत्रणा / जिल्हा परिषद अधिकारी यांची आढावा बैठक घेऊन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अनुज्ञेय कामे सुरु करण्याबाबत व मजूरांचे मागणीनुसार तात्काळ कामे उपलब्ध करुन देण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, मजूरांच्या काम मागणीनुसार कामे उपलब्ध करुन दिलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणेगांव (जि.नाशिक) कालवा व दरसवाडी पोहोच कालव्याची बांधकामे ही ठराविक कालावधीत पूर्ण करणेबाबत

(१९) १३६५८५ (०५-०७-२०१९). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणेगांव (जि.नाशिक) कालवा व दरसवाडी पोहोच कालव्याची बांधकामे ही ठराविक कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३० व १६ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पा.वि. महामंडळ, अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर, कार्यकारी अभियंता नांदूर मधमेश्वर प्रकल्प विभाग, नाशिक यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणेगांव-दरसवाडी-डोंगरगांव पोहोच कालवा प्रवाहीत होण्यासाठी या कालव्याचे अस्तरीकरण व विस्तारीकरण करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक १९ नोव्हेंबर २०१८, दिनांक ४ डिसेंबर, २०१८ व दिनांक २५ जून २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.जलसंपदा मंत्री आणि अधीक्षक अभियंता ला.वि.प्रा अहमदनगर यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागण्यांनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) : (१) होय.

(२) होय.

(३) i. उर्ध्व गोदावरी प्रकल्पाचा चतुर्थ सुप्रमाअहवाल तयार करणेची कार्यवाही प्रगतीपथावर असुन त्यात पुणेगाव डावा कालवा व दरसवाडी पोहोच कालव्याच्या अस्तरीकरणाच्या कामाचा समावेश करण्यात येत आहे.

ii. पुणेगाव डावा कालवा कि.मी. १ ते २५ मधील विस्तारीकरण कामांपैकी सद्यस्थितीत कि.मी. १ ते ८ मधील विस्तारीकरणाचे काम पुर्ण झाले आहे आणि कि.मी. ९ ते १२ दरम्यान बोगदा असुन कि.मी. १३ ते २५ मधील विस्तारीकरणाचे काम अंशत: पूर्ण असून उर्वरीत कामे प्रगतीत आहेत.

iii. दरसवाडी पोहोच कालवा कि.मी. ० ते ८८ पैकी कि.मी. ० ते ४२ तसेच कि.मी. ६१ ते ८८ कि.मी. ची कामे पुर्ण झालेली असुन ४३ ते ६० दरम्यानची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ओझरखेड (जि.नाशिक) डावा कालव्यासह वितरीकांची अपूर्ण कामे पूर्ण करणेबाबत

(२०) १३६६०४ (१०-०७-२०१९). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझरखेड (जि.नाशिक) डावा कालवा किमी ४९ ते ६३ व त्यामधील वितरीकांची अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ डिसेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपूर्ण कामे जलसंपदा बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यासाठी लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक यांनी माहे जुलै, २०१८ मध्ये मुख्य अभियंता उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांना प्रस्ताव पाठवलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) : (१) नाही.

तथापी, श्री.छगन भुजबळ, माजी उपमुख्यमंत्री यांनी दि.१०/१०/२०१८ रोजीच्या पत्रांन्वये याबाबतची मागणी मा.मंत्री, जलसंपदा व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांना केलेली आहे.

(२) होय.

(३) ओझरखेड कालव्याच्या किमी ४७.५० ते ६३.३०० या वाढीव कालव्याचे मातीकाम व बांधकामे पूर्ण झाली आहेत. यामधील वितरीका क्र. २६ ते ३४ च्या लाभक्षेत्रातील कामे प्रगतीत आहेत.

क्षेत्रिय अधिका-यांनी ओझरखेड कालव्यांची कार्यस्थळावर पाहणी करण्यात आलेली असून काही भागात दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे पहाणी अंती निदर्शनास आले आहे.

ओझरखेड कालव्याच्या दुरुस्ती व उर्वरीत वितरण व्यवस्थेची कामे कार्यान्वितीसाठी हाती घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे व भिवंडी शहर परिसरातील (जि.ठाणे) बेशिस्त व अनधिकृत रिक्षाचालकावर कारवाई करण्याबाबत

(२१) १३६६७१ (०९-०७-२०१९). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार

(सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात मुख्यत्वे पश्चिम बाजूच्या रेल्वे प्लॅटफार्मवर रिक्षा चालक स्वत: जाऊन प्रवाशांच्या हाताला धरून जबरदस्तीने भाडे घेणे, भिवंडीस जाण्याकरीता रिक्षांचे मीटर प्रमाणे भाडे न आकारणे, अंदाजित भाडे मागणे, रांगेत असलेल्या प्रवाशांना न घेता बाहेरील प्रवासी रिक्षेत बसविणे, बेशिस्त पार्किंग करणे असे गैरप्रकार सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी (जि.ठाणे) शहर परिसरात सुमारे २० हजाराहून अधिक अनधिकृत प्रवासी रिक्षा चालक असून शहरात फक्त ८ हजार अधिकृत रिक्षा चालक असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्षा चालक मीटर पद्धतीने रिक्षेचा दर आकारत नसुन मनमानीपणे शेअर भाडे प्रवाशांकडून आकारत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार ठाणे शहरातील बेशिस्त रिक्षाचालकांवर तसेच भिवंडी शहरातील अनधिकृत रिक्षा चालकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२३-०९-२०१९) : (१) अशा आशयाची बातमी दि.१६.०४.२०१९ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे येथील संगणकीय अभिलेखानुसार भिवंडी (जि.ठाणे) शहर परीसरातील रिक्षा चालकांची एकुण संख्या १६,५६८ एवढी आहे.

(३) ते (५) याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे या कार्यालयात ई-मेल, पत्र व टोल फ्री क्रमांकाव्दारे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने शहर वाहतूक उप शाखा, भिवंडी यांच्या समवेत संयुक्त विशेष मोहिमेव्दारे तसेच वायुवेग पथकामार्फत दोषी रिक्षाचालकावर प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे या कार्यालयामार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येते.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांच्या वायुवेग पथकामार्फत माहे एप्रिल, २०१८ ते माहे मार्च, २०१९ या कालावधीत रिक्षा चालकाविरुध्द केलेल्या कारवाईत २०५८ वाहने दोषी आढळून आली असून ३३८ परवाने व ५६४ अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आलेल्या आहे. सदर कारवाईत रू.८३.२१ लाख इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे

तसेच माहे एप्रिल, २०१८ ते माहे मे, २०१९ या कालावधीत भिवंडी येथे ऑटोरिक्षा विशेष तपासणी मोहीमेंतर्गत ४७५ वाहने दोषी आढळून आलेली असून १०८ परवाने व १४२ अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आलेल्या आहेत. सदर कारवाईतून रू.१२.८७ लाख इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

शहर (पोलिस) वाहतूक शाखा, ठाणे शहर यांनी सन २०१८ ते माहे मे, २०१९ या दरम्यान ३,७५,९३९ रिक्षा चालकावर कारवाई करण्यात येवून रू.६,३९,६३,५५०/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीश्रेत्र पद्मालय ते गालापूर (ता.एरंडोल, जि.जळगांव) या रस्त्याच्या कामाबाबत

(२२) १३६८४१ (०५-०७-२०१९). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) श्रीश्रेत्र पद्मालय ते गालापूर (ता.एरंडोल, जि.जळगांव) या रस्त्याच्या मजबूतीकरण व डांबरीकरणाच्या कामाची सद्:स्थिती काय आहे,

(२) तसेच या रस्त्याच्या कामासाठी किती आर्थिक तरतूद करण्यात आली व आतापर्यंत या रस्त्याच्या कामावर किती खर्च करण्यात आला आहे आणि रस्त्याचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१९) : (१) प्रश्नाधीन रस्त्याचे खडीकरण व पाईप मो-यांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(२) प्रश्नाधीन रस्त्याच्या कामासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी रू.३८.३९ लक्ष इतकी आर्थिक तरतूद करण्यात आली असून अद्यापर्यंत खर्च झालेला नाही. सदर रस्त्याचे काम निधी उपलब्धतेच्या अधिन राहून सप्टेंबर, २०१९ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

एरंडोल (जि.जळगांव) तालुक्यातील अंतुर्णी ते आडगांव या ४ कि.मी लांबीच्या रस्त्याच्या कामाबाबत

(२३) १३६८५९ (११-०७-२०१९). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) एरंडोल (जि.जळगांव) तालुक्यातील अंतुर्णी ते आडगांव या ४ कि.मी लांबीच्या कामाचे भूमिपूजन दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या कामासाठी किती खर्च अपेक्षित आहे व या रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१९) : (१) होय. हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन रस्त्याच्या कामावर रू. ११०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित असून रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वेंगुर्ला-बेळगांव- बागलकोट- बेल्लारी व आंबोली-आजरा-गडहिंग्लज-संकेश्वर या मार्गांचे केंद्र शासनाकडे हस्तांतरण करण्याबाबत

(२४) १३७१२२ (०५-०७-२०१९). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ला-बेळगांव-बागलकोट-बेल्लारी व आंबोली-आजरा-गडहिंग्लज-संकेश्वर या दोन राज्य मार्गांना केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग म्हणून मान्यता दिली असल्याने या महामार्गाचे केंद्र शासनाकडे हस्तांतर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सबंधिताकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या दोन्ही मार्गांचे केंद्र शासनाकडे हस्तांतरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०१९) : (१) हे अंशत: खरे आहे.

आंबोली-आजरा-गडहिंग्लज-संकेश्वर हा रस्ता रा.म.५४८ एच म्हणून घोषित झाला आहे. परंतु वेंगुर्ला-बेळगांव-बागलकोट-वेल्लारी या लांबीपैकी वेंगुर्ला-बेळगांव हा राज्यमार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वत: घोषित झाला आहे, तथापि सदर रस्त्यास अदयाप राष्ट्रीय महामार्ग क्रमांक प्राप्त झालेला नाही.

तसेच सदर महामार्ग केंद्र शासनाकडे हस्तांतर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मागणी पत्र प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

नव्याने घोषित झालेले सदर महामार्ग केंद्र शासनाकडे हस्तांतरण करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावरुन दि.३०.०१.२०१८ व ३१.०१.२०१९ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यात पाणी तपासणी प्रयोगशाळा उभारण्याबाबत

(२५) १३७१२८ (११-०७-२०१९). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात ग्रामीण भागात विहीर, बोअरवेल, तलाव यामधून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असून जिल्ह्यात पाणी तपासणी प्रयोगशाळा अत्यंत कमी असल्यामुळे पाणी तपासणी करणे शक्य होत नाही, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यात पाणी परिक्षण प्रयोगशाळा उभारणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (३०-०८-२०१९) : (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जिल्हा प्रयोगशाळेसह गडहिंग्लज, कोडोली, सोळांकूर व शिरोळ येथील ४ उपविभागीय प्रयोगशाळा याप्रमाणे एकूण ५ पाणी तपासणी प्रयोगशाळा पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. या पाचही प्रयोगशाळांमध्ये प्राप्त होणाऱ्या सर्व पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात येते. Uniform Drinking Water Protocol नुसार विहित केलेल्या नमुन्यांपेक्षा जास्त पाणी नमुने प्राप्त होत असल्याने, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आणखी एक उपविभागीय प्रयोगशाळा स्थापन करता येईल किंवा कसे याबाबत संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्यामार्फत तपासणी करण्यात येत आहे.

भोर (जि.पुणे) तालुक्यातील गुंजवणी धरणातून अधिक क्षमतेने पाणी सोडल्याने आदिवासी युवकाचा झालेला मृत्यू

(२६) १३७२७१ (११-०७-२०१९). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील गुंजवणी धरणातून अधिक क्षमतेने कोणतीही माहिती न देता जलसंपदा विभागाने नदीपात्रात पाणी सोडल्याने एक आदिवासी युवक वाहून जाऊन त्याचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर युवकाचा मृत्यू जलसंपदा विभागाच्या दुर्लक्षितेमुळे झाला असून त्याच्या मृतदेहाला अग्नी जलसंपदा निरा-देवघर कार्यलयासमोरच दिला जाईल अशा संतप्त भावना व्यक्त करुन मृतदेह संतप्त नातेवाईकांनी कार्यालयासमोर आणून ठेवला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) : (१) नाही.

गुंजवणी धरणाचे पाणी हे गुंजवणी नदीवरील को.प. बंधाऱ्याच्या सिंचनासाठी व नीरा कालवे प्रणालीतील कालव्याच्या सिंचनाकरिता दि.२५/१०/२०१८ पासून नदीत सोडले होते. सदर विसर्गाबाबत दि.०५/११/२०१८ रोजी पत्राव्दारे तहसिलदार, भोर, गटविकास अधिकारी, भोर व नदी लगतच्या गावांना गुंजवणी धरणातून को.प.बंधा-यासाठी व निरा प्रणालीसाठी सोडलेले पाणी वाढविण्यात येणार असल्याचे व त्यानुसार योग्य ती खबरदारी संबंधीत यंत्रणेने व गावक-यांनी घ्यावी असे कळविले होते. तसेच दरवेळी नदीतून पाणी सोडताना सर्व यंत्रणांना कळविले जाते. श्री.पराग रविंद्र इंगुळकर, रा.कामथडी, ता.भोर यांचे उंबरे हद्दीतील शेतीस पाणी पुरवठा करणारी गुंजवणी नदीवरील दगडाखाली अडकलेली नादूरुस्त मोटार बाहेर काढण्यासाठी बुडी मारल्यामुळे श्री.विलास परशुराम मोरे यांचा मुत्यू झाला आहे.

(२) होय.

भोर येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर मृत व्यक्तीचे नातेवाईक मृतदेह जलसंपदा विभागाच्या निरा देवधर विभागाच्या कार्यालयासमोर घेऊन आले होते. परंतू जलसंपदा विभागाचे कोणतेही कार्यालय या घटनेस जबाबदार नाही असे सांगितले व त्यांचे समाधान झाल्यानंतर मृताच्या नातेवाईकांनी मृतदेह अंत्यविधीसाठी नेला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वणी शहरातील निरगुडा नदी (जि.यवतमाळ) सांडपाण्यामुळे प्रदुषित होत असल्याबाबत

(२७) १३७५१७ (१०-०७-२०१९). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी शहरातील निरगुडा नदी (जि.यवतमाळ) लगतच्या लोकवस्तीमुळे तसेच पळसोनी आणि चिखलगाव येथील सांडपाण्यामुळे प्रदूषित झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षापूर्वी नदीचे खोलीकरण व सौंदर्यीकरण करण्यात आले होते सध्या नदीची दूरवस्था झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निरगुडा नदीत सोडण्यात येणारे सांडपाणी बंद करुन नदी प्रदुषित करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०४-०९-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) • वणी नगर परिषदेमार्फत २५० किलोलिटर/दिन क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचा प्रस्ताव दि. १७/११/२०१८ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर करण्यात आला आहे.

• वणी नगरपालिकेचे घरगुती सांडपाणी निरगुडा नदीत मिसळत असल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वणी नगरपालिकेस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मोखाडा व जव्हार (जि.पालघर) तालुक्यात रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

(२८) १३७७१२ (०२-०७-२०१९). श्री.अमित घोडा (पालघर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा व जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील मजूरांना रोजगार हमीची कामे मिळत नसल्यामुळे या तालुक्यांतील मजुर इतर जिल्ह्यात वा राज्याबाहेर स्थलांतरीत होत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजगार हमीच्या कामांसाठी ४७ हजार लोकांची नोंदणी झाली असली तरी फक्त १३ हजार लोकांनाच कामे मिळाली असून इतर लोकांना कामे न मिळाल्यामुळे लोकांना स्थलांतरी व्हावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मजुरांना कामे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयदत्त क्षीरसागर (०५-१०-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) जव्हार व मोखाडा या आदिवासी तालुक्यांत मजूरांची कामाची मागणी प्राप्त होताच ग्रामपंचायत व संबंधित यंत्रणा विभागांकडून मनरेगा अंतर्गत मजूरांना कामे तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर तालुक्यांत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एकूण २९,३१७ Active जॉबकार्डधारक कुटुंब असून माहे मार्च, पर्यंत त्यामधील ५७,९८० मजुरांना ३८०४ कामे पुरविण्यात आली आहेत.

नियोजन आराखड्यानुसार जव्हार व मोखाडा तालुक्यात मजूरांना कामे देण्याकरिता शेल्फवर एकूण ४५५७ कामे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. सद्यस्थितीत ४६६ कामे सुरु झालेली असून अद्यापपर्यंत सदर तालुक्यांत एकूण ३८०७२ मजूरांना कामे पुरविण्यात आलेली आहेत. त्यामुळे या तालुक्यातील मजूरांकडून कामाची मागणी प्राप्त होताच त्यांना संबंधित कामे पुरविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील आलेश्वर या गावात पूल बांधण्याबाबत

(२९) १३७७२४ (१०-०७-२०१९). श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील आलेश्वर या गावातील लोकांनी पुलाची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी पुलासाठीची मागणी प्रलंबित असून अद्यापही यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त ठिकाणी तात्काळ पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१९) : (१) होय हे खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्नाधीन रस्त्याच्या कामाबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

पुणे शहरातील सह-दुय्यम निबंधक कार्यालयात होत असलेले गैरव्यहार

(३०) १३७७४८ (०५-०७-२०१९). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील हवेली-१ ते हवेली-२८ अशा २८ सह-दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणीचे नियम न पाळता नागरिकांकडून अवैधरित्या पैसे घेतले जात असल्याचे तसेच सह-दुय्यम निबंधक, हवेली-९ यांना लाच घेताना लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते यांनी मा.महसूल मंत्री, प्रधानसचिव, मुख्यसचिव, मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे यांना ई-मेलद्वारे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान वारंवार कळविले असतानाही कोणतीही कार्यवाही करण्यात अली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार पुणे शहरातील हवेली-१ ते हवेली-२८ अशा २८ सह-दुय्यम निबंधक कार्यालयातील गैरप्रकार बंद करून सह-दुय्यम निबंधक, हवेली-९ यांच्यासह इतर दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२१-०९-२०१९) : (१) प्रभारी सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.९ यांना लाचलुचपत विभागाने पकडल्यामुळे त्यांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निबंधक, पुणे यांनी दिनांक ०८.०४.२०१९ रोजीच्या आदेशान्वये निलंबित केले आहे, हे खरे आहे.

उपरोक्त घटने व्यतीरिक्त हवेली क्र.१ ते क्र.२८ या कार्यालयात दस्त नोंदणीचे नियम न पाळता अवैधरित्या पैसे घेतले जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) हे खरे नाही, प्राप्त तक्रारींवर वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रभारी सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, हवेली क्र.९ यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्यामुळे जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दि.०८.०४.२०१९ च्या आदेशान्वये त्यांना शासकीय सेवेतून निलंबित केले आहे. उक्त प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत पुढील तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयील वाहन ४.० आणि सारथी ४.० ही अत्याधुनिक संगणक कार्यप्रणाली अधीक सोपी करण्याबाबत

(३१) १३७८५८ (१५-०७-२०१९). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वाहन ४.० आणि सारथी ४.० ही अत्याधुनिक संगणक कार्यप्रणाली कार्यान्वित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संगणक कार्यप्रणाली अनेक वेळा संथ गतीने तर बंद अवस्थेत असल्याने नागरीकांना परवान्यासाठी दलालांची मदत घ्यावी लागत असुन त्याकरीता नागरीकांना ४०० ते ५०० रुपये इतका खर्च करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संगणक प्रणाली सुरळीत व सोप्या पध्दतीने काम करेल याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त संगणक प्रणाली सुरळीत कार्यान्वित करणेबाबत केलेल्या उपाययोजनेची माहिती नागरिकांना केव्हापर्यत उपलब्ध होणार आहे ?

श्री. दिवाकर रावते (२९-०९-२०१९) : (१) होय.
(२) हे खरे नाही. राष्ट्रीय सुचना केंद्र यांनी विकसीत केलेल्या सारथी ४.० आणि वाहन ४.० या वेब आधारीत प्रणालीमध्ये ऑनलाईन कामकाज चालते. त्यामुळे प्रस्तुत कामकाज पुर्णत: इंटरनेट जोडणीवर अवलंबुन आहे. इंटरनेटचा वेग कमी झाल्यास अथवा संगणकामध्ये तांत्रिक अडचण असल्यास ऑनलाईन अर्ज स्वीकृती व अर्जनिपटारा गती बाधीत होत असते.

नागरीकांनी दलालापासुन सावध रहावे व त्यांच्या कामासाठी कोणत्याही मध्यस्ताची मदत घेवु नये अशा सुचना दर्शविणारे फलक प्रत्येक कार्यालयात प्रदर्शित करण्यात आले आहेत.
(३) सदर यंत्रणा सुरळीतपणे चालु रहावी यासाठी प्रत्येक कार्यालयात MPLS पध्दतीची १० MBPS जोडणी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. केंद्रीय संगणकातील अडचणीबाबत नियमीतपणे राष्ट्रीय सुचना केंद्र सोबत पाठपुरावा केला जातो.

परिवहन विभागाच्या सेवा नागरी सेवा केंद्रामार्फत उपलब्ध करुन देण्याबाबत करार करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मनरेगाची कोट्यवधीची कामे सेक्युअर प्रणालीमुळे बाधीत झाल्याबाबत

(३२) १३७९९१ (११-०७-२०१९). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मनरेगाची कोट्यवधीची कामे सेक्युअर प्रणालीची योग्य माहिती नसल्याने विस्कळीत झाल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगणक प्रणालीवर सेक्युअर प्रणालीची योग्य प्रशिक्षीत कर्मचारी मनरेगा आयुक्ताकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मनरेगाची कोट्यवधीची कामे तसेच निधी खर्च होत नसल्याने अनेक अधिकाऱ्यांनी संबंधित विभागाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रणाली अपडेट न झाल्याने विकासकामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार तात्काळ सेक्युअर प्रणाली अपडेट करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयदत्त क्षीरसागर (०३-१०-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

(२) मगाराग्रारोहयो-महाराष्ट्र, नागपूर आयुक्तालयाकडे SECURE Soft प्रणालीसाठी प्रशिक्षीत कर्मचारी उपलब्ध असून त्यांचे मार्फतच प्रत्येक विभागीय स्तरावर जाऊन जिल्हा व तालुका स्तरावरील तांत्रिक कर्मचाऱ्यांना डिसेंबर, २०१८ व मे, २०१९ मध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(३) होय. काही जिल्ह्यातील प्राप्त झालेल्या तक्रारींचे वेळेमध्येच निराकरण करण्यात आले आहे.

(४) व (५) हे खरे नाही. सद्य:स्थितीत प्रणाली अद्ययावत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील धामणी प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३३) १३९३८८ (०८-०७-२०१९). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी, गगनबावडा व पन्हाळा या तीन तालुक्यातील सुमारे ६० ते ७० वाड्यावस्त्यांमध्ये विभागलेल्या धामणी मध्यम प्रकल्पास सन २००० पासून सुरुवात झाली असून १८ वर्षात प्रकल्पाचे फक्त ७० टक्के काम झाले असून ३० टक्के काम प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धामणी खोऱ्यातील ६० ते ७० गावांच्या पिण्याच्या पाण्याची व सिंचनाच्या पाण्याची तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाचे ३० टक्के प्रलंबित काम पूर्ण करण्यासह स्थानिकांची पाणी टंचाई समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) : (१) होय. हे अशंत: खरे आहे.

धामणी प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण असून , प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण न झाल्याने प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र विरोधामुळे धामणी धरणाचे काम सन २०१३ पासून बंद आहे.
(२) होय.

धामणी धरणाच्या घळभरणीचे काम पूर्ण झाले नसल्याने धरणामध्ये पाणीसाठा करता येत नाही. त्यामुळे उन्हाळयामध्ये पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याची टंचाई निर्माण होते.
(३) सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करणेच्या दृष्टीने व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबतची कार्यवाही पुर्ण करण्याच्या दृष्टीने महसूल विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

प्रकल्पाच्या रु.७८२.३७ कोटी रक्कमेच्या द्वितीय सुप्रमा प्रस्तावास शासनाने काही अटींच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. शासन निर्णयातील अटीनुसार धरणाच्या कामाच्या ठेकेदाराची निविदा विखंडीत करण्यात आली असून , धरणाचे उर्वरित काम नवीन निविदेद्वारे करण्याच्या दृष्टीने माहे मार्च, २०१९ मध्ये निविदा सूचना प्रसिध्द केली होती. तथापि निविदा विखंडीत करणे, केलेल्या कामाच्या प्रलंबित देयकांची रक्कम व अन्य नुकसान भरपाई मिळणेबाबत कंत्राटदाराने न्यायालयात दावा दाखल केला आहे. त्यामुळे न्यायालयाने सदर निविदा सूचनेस अंतरिम स्थगिती दिली आहे. संबधित ठेकेदाराची प्रलंबित देणी देऊन स्थगिती उठविण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरापूर (ता.कडेगांव, जि.सांगली) येथे ताकारी योजनेच्या मुख्य कालव्याचे अस्तरीकरण करणेबाबत

(३४) १३९६१५ (१०-०७-२०१९). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरापूर (ता.कडेगांव, जि.सांगली) येथे ताकारी योजनेच्या मुख्य कालव्याचे अस्तरीकरण व प्लॉस्टचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या कामासाठी कालव्यातील पाणी अडविल्याने ते पाझरुन वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम तात्काळ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) : (१) होय.

अमरापूर (ता.कडेगांव, जि.सांगली) येथे ताकारी मुख्य कालवा ३० ते ४६ कि.मी. मधील उर्वरित अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) नाही.

अमरापूर गावाच्या हद्दीतील अस्तरीकरणाचे काम हे ताकारी मुख्य कालव्याचे ३० ते ४६ कि.मी. मधील उर्वरीत अस्तरीकरणाचे काम या निविदेअंतर्गत आहे. त्यानुसार सन २०१८-१९ मधील रब्बी हंगामाचे आवर्तन संपल्यानंतर व उन्हाळी हंगामाचे आवर्तन क्र.१ सुरु करण्यापूर्वी सदरचे काम हाती घेण्यात आले होते.

उन्हाळी हंगामाचे आवर्तन क्र.१ सुरु झाल्यानंतर प्रथमत: ताकारी मुख्य कालवा १ ते २२ कि.मी. व टप्पा क्र. ३ व ४ मधील सिंचन आवर्तन व त्याचवेळी ३० ते ७० कि.मी. मध्ये अस्तरीकरणाचे काम सुरु होते. १ ते २२ कि.मी. मधील सिंचन चालू ठेवून जादाचे पाणी वाया जाऊ नये म्हणून केवळ २३ ते ३० मधील सिंचन करता येणे शक्य होते. यासाठी ताकारी मुख्य कालवा ३१ कि.मी. मधील सा.क्र.३०७०० मी. येथे बांध घालून अतिरिक्त २३ ते ३० कि.मी. मधील सिंचनासाठी पाणी देण्यात आल्यामुळे पाणी पाझरुन वाया गेले असे घडले नाही.

(३) ताकारी मुख्य कालव्याचे पाण्याचे वहन व्यय कमी होऊन सिंचन आवर्तन कालावधी कमीत कमी होण्यासाठी १ ते १०० कि.मी. मधील उर्वरित ४७ कि.मी. लांबीतील अस्तरीकरणाची कामे प्रगतीपथावर असून त्यापैकी २१ कि.मी. लांबीचे अस्तरीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित अस्तरीकरण डिसेंबर, २०१९ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना सिंचन विहिरांचा लाभ मिळण्यासाठी अटी शिथिल करणेबाबत

(३५) १३९७६७ (१०-०७-२०१९). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील काही भागातील कोरडवाहू शेतकरी सिंचन व्यवस्थेसाठी सिंचन विहिरी, शेततळयाची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजनेतून सिंचन विहिरींची कामे करत असतांना मजूर मिळत नाहीत, मजूरी वेळेवर जमा केली जात नसल्याने मजूर कामास येत नाहीत त्यामुळे सध्या असलेल्या अटी शिथील करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंचन विहिरांचा लाभ घेण्यासाठी सध्या असलेल्या अटी शिथिल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयदत्त क्षीरसागर (०५-१०-२०१९) : (१) नाही, हे खरे नाही.

सातत्याने दुष्काळाला सामोरे जात असल्याची परिस्थिती कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आढळून आलेली नाही. तथापि, कृषी सिंचनाकरिता सिंचन विहिरी व शेततळी उपयुक्त ठरतात.

(२) नाही, हे खरे नाही.

रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरींची कामे करत असतांना मजूर मिळत नसल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच, मजूरांना केलेल्या कामाची मजुरी विहित वेळेत अदा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

म्हसळा गोरेगाव रस्त्यावर असलेल्या मढेगाव (जि.रायगड) गावातील पाणी टंचाई दूर करणेबाबत

(३६) १४००१० (१०-०७-२०१९). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसळा गोरेगाव रस्त्यावर असलेल्या मढेगाव (जि.रायगड) गावात लाखो रुपये खर्च करुन सुरु करण्यात आलेली नळपाणी पुरवठा योजना बंद असून सध्या या गावात पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०९-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) मौजे मढेगाव गावाकरीता सन २०१३-१४ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. सदर योजना मढेगाव ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, मढेगाव यांच्यामार्फत राबविण्यात आली असून योजनेतून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. योजनेच्या कामाकरीता रु.३९.८७ लक्ष इतकी रक्कम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस अदा करण्यात आली आहे. सन २०१८-१९ च्या उन्हाळ्यात उद्भव विहीरीस पाणी कमी झाल्याने ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत पाणी पुरवठा एक दिवसाआड करण्यात आला होता. सद्य:स्थितीत योजनेच्या उद्भव विहीरीस पुरेसा पाणी साठा असून दररोज पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाघेरी मठ खुर्द (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावासाठी रस्त्याचे काम सुरु करणेबाबत

(३७) १४०५९५ (०५-०७-२०१९). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघेरी मठ खुर्द (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावासाठी प्रजिमा-७ करीता २०१८-१९ या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधीच्या अनुषंगाने रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे व या रस्त्याच्या कामात डांबरीकरणासह संरक्षक भिंतीचे कामही समाविष्ट आहे काय तसेच या रस्त्याचे ठेकेदार कोण आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१७-०९-२०१९) : (१) होय.

(२) सदरचे काम अर्थसंकल्पिय कामे सन २०१८-१९ व्दिवार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत कार्यारंभ आदेश दि. ८.३.२०१९ अन्वये श्री एम. टी. शिरगांवकर, मु,पो.कणकवली यांना प्रदान करण्यात आले आहे. या कामाची मुदत १२ महिने आहे.

प्रश्नांकित हुमरठ वाघेरी घोणसरी रस्ता प्रजिमा-७ या रस्त्यावरील डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असून त्यामध्ये संरक्षक भिंत बांधण्याचे काम समाविष्ट नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोपरगांव (जि.अहमदनगर) तालुक्यातून गेलेल्या नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यांच्या वितरीकांसाठी भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

(३८) १४०६०४ (१०-०७-२०१९). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगांव (जि.अहमदनगर) तालुक्यातून गेलेल्या नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यांच्या वितरीकांसाठी भूसंपादन केलेल्या जमिनींचा मोबदला अद्यापपर्यंत शेतक-यांना मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यांच्या वितरीकांसाठी भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) : (१) व (२) नांदूर मधमेश्वर कालवा/वितरिका १, २ व त्यावरील उपवितरीका आणि लघुवितरिकेच्या कोपरगांव तालुक्यातील एकूण १२ भुसंपादनाचे प्रस्ताव असून त्यापैकी ४ भुसंपादनाची प्रकरणे जिल्हाधिकारी, भुसंपादन समन्वय अहमदनगर यांना सादर केली आहेत. उर्वरित ८ प्रकरणे सरळ खरेदीने सादर करावयाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार विभागीय स्तरावरुन मोबदला अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोपरगांव (जि.अहमदनगर) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

(३९) १४०६५८ (०५-०७-२०१९). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कोपरगांव (जि.अहमदनगर) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात मंजूर पदानुसार अधिकारी व कर्मचारी कार्यरत नसल्याने कार्यालयीन तसेच महत्वाची इतर कामे करण्यात अडचणी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन या उपविभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०९-२०१९) : (१) नाही.

कोपरगांव (जि.अहमदनगर) येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे सा.बां. उपविभाग क्र.१ कोपरगांव व सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२ कोपरंगाव असे एकूण २ उप विभाग कार्यरत आहेत.

सा.बां. उपविभाग क्र.१ कोपरगांव कार्यालयांतर्गत १७ मंजूर पदांपैकी १४ पदे कार्यरत असून ३ पदे रिक्त आहेत. तसेच सा.बां.उपविभाग क्र.२ कोपरगांव कार्यालयांतर्गत १७ पदे मंजूर असून ४ पदे कार्यरत व १३ पदे रिक्त आहेत. सदर कार्यालयात कामाचे स्वरुप अल्प असून त्याकरीता उपलब्ध असलेला कर्मचारी वर्ग पुरेसा असल्याने कामात कोणतीही अडचण उद्भवत नाही.

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दि.११.७.२०१९, दि.१६.०८.२०१९ व दि.२९.०८.२०१९ अन्वये अहमदनगर जिल्ह्यातील रिक्त पदे सरळसेवेने/ बदलीने भरण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली विधानसभा क्षेत्रामधील धडक सिंचन विहीर बांधकामाबाबत

(४०) १४०६७६ (११-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली विधानसभा क्षेत्रामध्ये धडक सिंचन विहीर बांधकाम कोणकोणत्या योजनेतून किती मंजूर करण्यात आल्या आहेत,

(२) असल्यास, गडचिरोली चामोर्शी व धानोरा या तीन तालुक्यात तसेच विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्गीयासाठी किती धडक सिंचन विहीर मंजूर करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, गडचिरोली विधानसभा क्षेत्रामधील धडक सिंचन विहीर बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयदत्त क्षीरसागर (०३-१०-२०१९) : (१) नागपूर विभागतील ११००० सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत गडचिरोली जिल्ह्यात १३५० सिंचन विहीरी मंजूर करण्यात आल्या.

(२) सदर योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्राथमिकतेनुसार करण्यात येते. तद्नुसार ज्या कुटूंबामध्ये आत्महत्या झालेली आहे त्यांचे वारसदार, दारिद्र्यरेषेखालील शेतकरी व इतर लाभार्थी अशा एकूण १३५० लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

(३) एकूण मंजूर १३५० सिंचन विहीरींपैकी १३३२ सिंचन विहिरीची कामे पूर्ण झालेली आहेत. १८ सिंचन विहीरीची कामे निष्फळ झालेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली विधानसभा क्षेत्रामधील शेततळ्यांच्या बांधकामाची माहिती देण्याबाबत

(४१) १४०६७७ (११-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली विधानसभा क्षेत्रामध्ये शेततळ्यांची बांधकाम कोणत्या योजनेतून किती मंजूर करण्यात आले,

(२) असल्यास, गडचिरोली चामोर्शी व धानोरा या तीन तालुक्यात तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीसाठी किती शेततळी मंजूर झाली आहेत,

(३) असल्यास, गडचिरोली विधानसभा क्षेत्रामधील शेततळ्यांच्या बांधकामाची माहिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयदत्त क्षीरसागर (०३-१०-२०१९) : (१) गडचिरोली विधानसभा क्षेत्रामध्ये मागेल त्याला शेततळे योजनेतून ५१०५ शेततळी मंजूर करण्यात आली.

(२) गडचिरोली, चामोर्शी व धानोरा या तीन तालुक्यात भटक्या जाती व इतर मागसवर्गीयांसाठी अनुक्रमे ४२ व १५८० शेततळी मंजूर झाली आहेत.

(३) शेततळयांच्या माहितीबाबत क्षेत्रिय स्तरावर विविध कृषि मेळावे, कृषि प्रशिक्षण सत्र, शेतकरी सभा यामध्ये प्रचार प्रसिध्दी करण्यात येते. तसेच कामाच्या माहितीस प्रसिध्दी देण्यात येते. शिवाय विविध स्तरावर अधिकारी व लोकप्रतिनिधी यांचेमार्फत होणाऱ्या आढावा बैठकीत माहिती सादर करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्हयातील गडचिरोली, चामोर्शी व धानोरा तालुक्यातील रेती घाटांबाबत

(४२) १४०६८१ (०६-०८-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील गडचिरोली, चामोर्शी व धानोरा तालुक्यात एकूण किती रेतीघाट आहेत,
(२) असल्यास, सन २०१४-१५ ते २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये उक्त रेती घाटावरुन शासनाला किती महसूल प्राप्त झाला,
(३) असल्यास, प्राप्त झालेल्या महसुलापैकी किती महसुल जिल्हयासाठी वापरण्यात आला तसेच या रेटीघांटाची निविदा प्राक्रिया कशाप्रकारे राबविण्यात येते ?

श्री. चंद्रकांत पाटील (१८-०९-२०१९) : (१) गडचिरोली जिल्हयातील गडचिरोली तालुक्यात ३२, चामोर्शी तालुक्यात १० व धानोरा तालुक्यात ०९ असे एकूण ५१ वाळूघाट आहेत.
(२) सन २०१४-१५ ते २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये गडचिरोली जिल्हयात उक्त वाळूघाटाद्वारे शासनास रु.१८,११,४५,१०२/- इतका महसूल प्राप्त झाला आहे.
(३) गडचिरोली जिल्हयातून शासनास वर्षनिहाय वाळू व इतर गौण खनिजापासून प्राप्त एकूण महसूलाचे प्रमाणात सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ या कालावधीत रु.५६,५९,०००/- इतके ग्रामपंचायत अनुदान गडचिरोली जिल्हयात तालुकानिहाय वाटप करण्यात आले आहे.

वाळूगटाची लिलाव प्रक्रिया निविदा ई-टेंडरिंग व ई-ऑक्शन या पध्दतीने विभागीय स्तरावरील दोन प्रमुख वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रकाशीत करुन राबविण्यात येते.

पुरंजळ (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील २० गाव पाणीपुरवठा योजनेचे कार्यारंभ आदेश देण्यास विलंब लागत असल्याबाबत

(४३) १४११३७ (११-०७-२०१९). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंढा नागनाथ तालुक्यातील (जि.हिंगोली) पुरंजळ २० गाव पाणीपुरवठा योजना पुनर्जिवीत करण्यासाठी शासनाने रुपये ५ कोटी ३८ लाखांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकाऱ्यांच्या नियोजन शुन्य कामामुळे निविदा निघूनही लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागल्याने कार्यारंभ आदेश काढण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या योजनेसाठी कार्यारंभ आदेश न काढता कामात दिरंगाई केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (३०-०८-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौ.पुरजळ-२० गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जिवित करण्यास दिनांक १३.०२.२०१९ रोजी शासन निर्णयाव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर योजनेची ई-निविदा दिनांक २१.०२.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली व दिनांक ०२.०३.२०१९ रोजी तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. संबंधित कंत्राटदाराने दिनांक ०७.०३.२०१९ रोजी सदर योजनेचे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास सहमती दर्शविली. दरम्यानच्या कालावधीत दिनांक १०.०३.२०१९ रोजी लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे करारनामा करता आला नाही.

दिनांक २४.०५.२०१९ रोजी योजनेचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून, दिनांक ०४.०६.२०१९ रोजी कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आलेल्या सिंचन विहीरीबाबत

(४४) १४११४१ (११-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली विधानसभा क्षेत्रात सन २०१४-१५ ते २०१९ पर्यन्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत किती धडक सिंचन विहिरी योजना मंजूर करण्यात आल्या आहेत,

(२) असल्यास, त्यातील किती योजना कार्यान्वित करण्यात आल्या व किती योजनाची कामे मुदतपूर्व वा मुदतीत करण्यात आली,

(३) असल्यास, नियोजित कालावधीत काम सुरू न केलेल्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयदत्त क्षीरसागर (०३-१०-२०१९) : (१) लघुपाटबंधारे विभाग जिल्हा परिषद, गडचिरोली विभागांतर्गत सन २०१५-१६ ते सन २०१९ चा सिंचन कार्यक्रमांतर्गत गडचिरोली विधानसभा क्षेत्रात एकूण १३५० सिंचन विहीरी मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

(२) मंजूर करण्यात आलेल्या १३५० सिंचन विहीरींपैकी १३३२ विहिरींची कामे पूर्ण झाली असून, १८ सिंचन विहीरीचे कामे निष्फळ झालेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

एकात्मिक राज्य जल आराखड्याबाबत

(४५) १४१२२२ (११-०७-२०१९). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृष्णा, गोदावरी, तापी, नर्मदा, कोकण व महानदी या सहा खो-यांचा मिळून एकात्मिक जल आराखडा शासनाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आराखड्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर जल आराखड्यामुळे राज्यातील जलसिंचन क्षमता किती वाढणार आहे व सदर आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी किती निधी लागणार आहे ?

श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) : (१) होय.
(२) एकात्मिक राज्य जल आराखडयाचे एकूण तीन खंड करण्यात आले आहेत.

खंड-१ (Volume-I) मध्ये प्रस्तावना (Preface), कार्यकारी सारांश (Executive Summary), कृती आराखडा (Action Plan) व एकूण २६ प्रकरणे इत्यादींचा समावेश आहे.

खंड-२ (Volume-II) मध्ये उपखोरेनिहाय पाणी उपलब्धता / पाणी वापर तक्ता (Sub Basin wise Summary Sheets), ठळक वैशिष्ठये (Salient Features), प्रकल्पांची यादी (List of Projects) इत्यादी माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

खंड-३ (Volume-III) मध्ये महाराष्ट्राचे खोरेनिहाय विविध वैशिष्ठये दर्शविणाऱ्या नकाशांचा समावेश करण्यात आला आहे.

राज्य जल आराखडयात सन २०३० पर्यंतच्या एकूण जल वापराचे नियोजन केलेले आहे. एकात्मिक राज्य जल आराखडयामध्ये गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, महानदी व पश्चिम वाहिनी नद्यांचे खोऱ्यातील पाणी उपलब्धता व वापराचे अनुषंगाने खोरे विकासाचे धोरण व नियोजन अंतर्भूत आहे. उक्त आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी जलसंपदा विभाग, कृषी विभाग, राजस्व विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, शहरी / ग्रामीण विकास विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना निरनिराळया जबाबदाऱ्या व उदिष्टे नेमून दिली आहेत.
(३) एकात्मिक राज्य जल आराखडयात नमूद केल्यानुसार एकूण ६७० प्रकल्प पूर्ण करण्याकरिता ७८४५० कोटी रुपयांची गरज असून त्याव्दारे वाढीव ३५.६८ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणे अपेक्षित आहे.

मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यामधील पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

(४६) १४१२९४ (१०-०७-२०१९). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यामधील चांडस-३, डुबलवेल-८, करडा-२, चिंचाबाभर-४ या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांवर लाखो रुपये खर्च करुनही त्या बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिसोड व मालेगांव तालुक्यात सतत कमी पडणारा पाऊस व या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेमधील गावे ही पाणीटंचाई क्षेत्रात मोडतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या टंचाईग्रस्त गावाजवळ काही नविन स्वंतत्र उद्भव निर्माण झालेले असून या प्रादेशिक योजनातील गावांना शासनाच्या दिनांक २७ जून, २०११ च्या परिपत्रकानुसार नजीकच्या नविन उद्भवावरुन स्वंतत्र योजना मंजूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी वारंवार मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (३१-०८-२०१९) : (१) हे खरे नाही.

सदर चार प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जिवित करुन पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत दुबळवेल-८ गावे व करडा-२ गावे प्रादेशिक योजनातून पाणीपुरवठा सुरु आहे. परंतू कमी व अनियमित पर्जन्यमानामुळे चांडस-५ गावे व चिंचाबाभर-४ गावे योजनांच्या उद्भव धरणातील पाणीसाठा संपल्यामुळे या दोन योजनांतून माहे मे, २०१९ पासून पाणीपुरवठा बंद आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) संबंधित ग्रामपंचायतींना त्यांचे मागणीनुसार स्वतंत्र योजना घेण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आली होती. परंतू एकाही ग्रामपंचायतीने स्वतंत्र योजनेचा प्रस्ताव सन २०१५-१६ पर्यंत सादर केला नाही. तद्नंतर मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद पडलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतीच्या सहमतीने पुनरुज्जीवित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील बाणेर येथील सर्वे नंबर ३३/२ पै/१ या अस्तित्वात नसलेल्या जमिनीची नोंद सातबारा उताऱ्यावर केल्याबाबत

(४७) १४१४६७ (०५-०७-२०१९). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील बाणेर येथील सर्वे नंबर ३३/२ पै/१ या अस्तित्वात नसलेल्या जमिनीची नोंद सातबारा उताऱ्यावर केल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातबारावर मुळ क्षेत्रापेक्षा जास्त नोंद झाल्याचे निदर्शनास आणुन दिल्यानंतरही अधिक क्षेत्राची नोंद करण्याचे आदेश दिले गेले असून महसुल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातबारा उताऱ्यावर खाडाखोड केल्याचे स्पष्ट दिसुन येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (३१-०८-२०१९) : (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पाटबंधारे विभागातील कुष्णा खोरे, कोकण, तापी, गोदावरी तसेच विदर्भ महामंडळामधील कर्मचाऱ्यांची पेन्शनची रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होत नसल्याबाबत

(४८) १४२२४३ (११-०७-२०१९). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटबंधारे विभागातील कुष्णा खोरे,कोकण,तापी,गोदावरी तसेच विदर्भ महामंडळामधील जवळपास ११ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांची सन २००५ पासूनची पेन्शनची रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमाच होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १३ वर्षांपासूनची निवृत्तीवेतनाची रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होत नसल्याने कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याने या सर्व प्रकाराची तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी पाटबंधारे कर्मचाऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (३०-०९-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

पाटबंधारे विभागातील कृष्णा खोरे, कोकण, तापी, गोदावरी व विदर्भ पाटबंधारे महामंडळांतर्गत दिनांक १/११/२००५ नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या ९६९७ कर्मचा-यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू नाही. सदर कर्मचा-यांपैकी ९४४८ कर्मचा-यांना डिसीपीएस/एनपीएस क्रमांक प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ९३७० कर्मचा-यांचे अंशदान तसेच शासनाचे समतूल्य अंशदान महामंडळांमार्फत कोषागार कार्यालयात जमा करण्यात येत आहे. ज्या कर्मचा-यांना डिसीपीएस/एनपीएस क्रमांक प्राप्त झालेले नाहीत, त्यांना ते उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही महामंडळांमार्फत सुरु आहे.

(२) अशी मागणी करण्यात आलेली नाही.

सन २००५ ते २०१६ या कालावधीतील महामंडळातील अधिकारी/कर्मचा-यांचे कपात केलेले अंशदान व शासनाचे समतूल्य अंशदान यांची रक्कम चलनामार्फत कोषागारात भरण्यात आली आहे. सदरच्या रकमा ह्या संबंधित कर्मचा-यांना प्राण क्रमांक मिळण्यापूर्वीच्या आहेत. त्या रकमा प्राण क्रमांकावर वर्ग करण्याची सुविधा सेवार्थ प्रणालीत उपलब्ध नसल्याने तसेच काही तांत्रिक अडचणींमुळे संबंधितांच्या एनपीएस खात्यावर वर्ग करता आलेल्या नाहीत. या रकमा एनपीएस खात्यावर वर्ग करण्याच्या दृष्टीने कस्टमाईज्ड प्रणाली विकसित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जऊळका, वडी, वरदरी बु.या तीन (जि.वाशिम) गावांसाठी मंजूर पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

(४९) १४२४४४ (११-०७-२०१९). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जऊळका, वडी, वरदरी बु.या तीन (जि.वाशिम) गावांसाठी मंजूर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी १ कोटी ७६ लाख रुपये मंजूर झाले असूनही सदर काम सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर योजना पुर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (३०-०८-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौ.जऊळका-३ गावे (ता.मालेगाव, जि.वाशिम) प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जिवित करण्याबाबतच्या रु.१७६.४७ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१७ रोजी प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार योजनेची कामे पुर्ण करुन पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील गावांकरिता राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये गैरव्यवहार होत असल्याबाबत

(५०) १४२६३२ (११-०७-२०१९). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत अलिबाग तालुक्यातील गावांगावांमधील ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनेसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी जिल्हा परिषद, रायगड यांना दिला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या निधीचा खर्च, योजनेतील कामातील अनिमितता, दिरंगाई, निकृष्ट दर्जाची कामे व आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे या कामासाठी नोंदणीकृत ठेकेदारालाच काम देण्याचा निर्णयही जिल्हा परिषदेने घेऊन त्यावर देखरेख करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अलिबाग तालुक्यातील पाणी पुरवठा योजने व गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०९-२०१९) : (१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १७ मार्च, २०१० रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे संबंधित ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समित्यांमार्फत राबविल्या जात. मात्र, दिनांक ०९ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समित्यांना देण्यात आलेले अधिकार कमी करण्यात आले असून सदर अधिकार जिल्हा परिषदेस देण्यात आले आहेत. त्यानुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे जिल्हा परिषद स्तरावरुन ई-निविदा प्रक्रिया राबवून नियमित बी-१ ठेक्याप्रमाणे राबविण्यात येत आहेत.
(३) अलिबाग तालुक्यातील सदर योजनांच्या कामांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही. सद्य:स्थितीत अलिबाग तालुक्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेल्या रु.७३३.५३ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय रकमेच्या १३ नळ पाणी पुरवठा योजनांची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण करुन सदर योजनांद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात

आला आहे. मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेल्या रु.८९२.८३ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय रकमेच्या ५ नळ पाणी पुरवठा योजनांपैकी ४ योजनांची कामे प्रगतीत असून २ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. १ योजनेचे काम आहे त्या स्थितीत अंतिम करुन नव्याने सुधारीत निविदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सन २०१८-१९ मधील मंजूर असलेल्या रु.११६५.०० लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय रकमेच्या ६ योजनांपैकी १ योजनेचे काम पूर्ण झाले असून ५ योजनांची कामे प्रगतीत आहेत.

विधान भवन :
मुंबई.

सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.